# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर

**दिनांक १३/०५/२०२१ (गुरुवार)**

---

**—: चोरी :—**

पो.स्टे. मौदा :— अंतर्गत १३ कि.मी. अंतरावरील मौजा पळसाड शिवारात मनोहर देविदास लांजेवार रा.निबा ता. कामठी जि. नागपूर यांनी त्यांचे शेतात गोठयात बांधलेले एक पांढरा बैल भुरसर रंगाचा कि. अंदाजे ३५,००० रु व एक लाल रंगाचा गोरा कि. १५००० रु असा एकूण ५०,००० रु. चे जनावर दिनांक ११/०५/२०२१ चे रात्री अज्ञात इसमांनी चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी मनोहर देविदास लांजेवार वय ४४ वर्षे रा. निबा ता. कामठी जि. नागपूर चे तोंडी रिपार्टवरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. मौदा येथे कलम ३७९ भादवी चा गुन्हा नोंद असून पुढील तपास पोहवा प्रशांत काळे मो न ९८२२५४९६९५ हे करीत आहे.

**पो.स्टे. कुही :—** अंतर्गत २५ कि.मी. अंतरावरील मौजा पॉचगांव बस स्टॉप जवळ जैन कंपनी द्वारे डी.पी. रोडचे कार्य सुरु आहे. सदर कंपनीचे टिप्पर क्र. एम एच ४० ए के ६६४३ मध्ये दिपक बाबुराव इंगळे वय ३२ वर्ष रा. प्लॉट नं. २१ उमरेड रोड न्यू नाका न. ०७ मागे साई नगर दिघोरी नागपुर हा चालक म्हणून असून हा दिनांक १२/०५/२०२१ चे रात्री ०९.३० वा. दरम्यान स्वत: चालवित असलेल्या टिप्पर चे डिझेल टंक मधुन कंपनिच्या परवानगिशिवाय टिप्पर मधुल नळीच्या साहायाने डपकीमध्ये डिझेल काढण्याच्या प्रयत्न करतांनी मिळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी मयुर कवळुजी गलमाने रा. वार्ड क्र.०२ पाचगांव ता. उमरेड जि. नागपुर चे लेखी रिपोर्ट वरुन दिपक बाबुराव इंगळे वय ३२ वर्ष रा. प्लॉट नं. २१ उमरेड रोड न्यू नाका न. ०७ मागे साई नगर दिघोरी नागपुर यांचे विरुध्द पो.स्टे. कुही येथे कलम ३७९,५११ भादवी चा गुन्हा नोंद केला असून पुढील तपास पोउपनि भारत थिटे पो. स्टे. कुही मो. क्र. ९६२३८५७०६८ हे करीत आहे.

**—: जबरी संभोग :—**

**पो.स्टे. एम.आय.डी.सी.बोरी :—** अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील मौजा टेंभरी येथील जितेंन्द्र उर्फ सोनु मनोहर टेभुर्णे वय २६ रा. माहुरकुडा अर्जुनी मोरगाव जि. गोदिया ह.मु. चंदन गणविर यांचे घरी किरायाने टेभरी ता. हिंगणा यांने पिडीत बाईला मोबाईल रिचार्ज करण्याकरीता फिर्यादीस १००/— रू उसणे मागीतले असता ती पैसे

देण्याकरीता यांचे रूमवर गेली असता जितेंन्द्र उर्फ सोनु मनोहर टेभुर्णे यांने तिचे हात धरून आपले रूममध्ये ओढुन जबरदस्तीने शारिरीक संबंध प्रस्तापीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन आरोपी जितेंन्द्र उर्फ सोनु मनोहर टेभुर्णे वय २६ रा. माहुरकुडा अर्जुनी मोरगाव जि. गोदिया ह.मु. चंदन गणविर यांचे घरी किरायाने टेभरी ता. हिंगणा याचे विरुध्द पो.स्टे. एम. आय.डी.सी.बोरी येथे कलम ३७६ भादवी चा गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास मपोउपनि पल्लवी काकडे मो.क्र.९५११८३४७५ हे करीत आहे.

## —: पळवुन नेणे :—

**पो.स्टे. कळमेश्वर —**अंतर्गत १२ कि.मी. अंतरावरील मौजा गौडखैरी बरड येथे राहणाऱ्या फिर्यादी ची १६ वर्षाची अल्पवयीन मुलगी ही घरी कोणाला काही न सांगता निघुन गेली तिचा शोध घेतला असता मिळुन आली नाही दरम्यान फिर्यादी चा भाचा याने फोन वरुन सुचना दिली की, तुमची मुलगी ही राज रंजित भोसले सोबत पारडसिंगा सतीअनुसया माता मंदीर येथे दिसले व याला पाहताच पळुन गेल.

सदर प्रकरणी फिर्यादी चे तोंडी रिपोर्ट वरुन आरोपी राज रंजीत भोसले वय २५ वर्ष रा.उमठा त.नरखेड विरुध्द पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम ३६३ भादवी गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सपोनी तेजराम मेश्राम मो क्र. ९०७५२४५०५९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर